कला अकादमी गोवा
कांपाल - पणजी
कअ/रंमेळ/धआ/२०२५-२६/१४०८
दि.१७/११/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या रंगमेळतर्फे भगवान "बिरसा मुंडा" यांच्या जीवन आणि संघर्षावर आधारित "धरती आबा" या नाटकाचा प्रयोग सेरेंडिपिटी आर्टस् फेस्टिवलात गोवा मुक्ती दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. दिनानाथ मंगेशकर कला मंदिर, पणजी येथे आयोजित केला आहे.

सदर नाटकाचे लेखन ऋषिकेश सुलभ यांनी केले असून गोव्यातील आघाडीचे रंगकर्मी श्री. सुशांत नायक यांची निर्मिती संकल्पना आणि दिग्दर्शन या नाटकाला लाभलं आहे. नाटकाचे नेपथ्य- योगेश कापडी, प्रकाशयोजना- तेजस खेडेकर, संगीत- सिंधुराज कामत, वेशभूषा- अलीशा मिनेजिस, नृत्य संकल्पना-माधुरी शेटकर, रंगभूषा- सागर हळदणकर यांची आहे. मंच वस्तु-संजय गावकर, रंगमंच व्यवस्थापक- प्रेमानंद पोळे आणि कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. शंकर बा. गावकर हे या नाटकाचे निर्माते आहेत.

सदर नाटकास शांताराम पवार, अजित कामत, माधुरी शेटकर, मयुर मयेकर, प्रेमानंद पोळे, ज्ञानेश्वर पार्सेकर, अनिनेश सावंत, दिनेश कुंडईकर, सदानंद गावडे, ईशा पार्सेकर, अनिकेत नांगरे, अंकिता सावंत, अनुष्का रणदिवे, तानिया गायकवाड, राजरत्न कौशल्य, विजय पालकर, मंजुनाथ गौडा, पर्व शेटकर यांनी भूमिका साकारल्या आहेत.

भगवान बिरसा मुंडा १२५ व्या जयंती निमित्त कला अकादमीने "धरती आबा" या नाटकाची निर्मिती केली असून काणकोण येथे रविंद्र भवनात हल्लीच या नाटकाचा प्रयोग सादर केला होता सदर नाटकास नाटय रसिकांकडून उत्फूर्त असा प्रतिसाद मिळालेला होता.

सदर नाटयप्रयोग सर्वांसाठी खुला असून नाटयरसिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. सुशांत नायक)
रंगमेळ प्रमुख
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूं ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)